उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

उन्नती संस्थेद्वारा प्रकाशित -

# बिडे वार्तापत्र

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

**पत्र ४, महिना – मार्च २०१७**

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

========================

## मुलांची प्रगती आपणच तपासूया !!

जूनमध्ये शाळा सुरु झाल्या आणि आता शाळेचे वर्ष संपायला आले. मुलं वर्षभर काय शिकली आणि काय नाही याची चाचणी शाळा घेतच असते. पण तुमच्या मुलांना लिहा-वाचायला येतं का ? हे पाहण्याची जबाबदारी तुमचीसुद्धा आहे. पुढील गोष्टी या इयत्ता २ री पासून पुढील वर्गात शिकणाऱ्या मुलामुलींसाठी आहेत. त्यासाठी काही भाषांमध्ये (मराठी, कोरकू आणि नेमाडी) अक्षरे, शब्द आणि परिच्छेद दिलेले आहेत.

सूचना – वाचन घेताना, मुलांना सुरवातीला विश्वासात घ्या, येत असेल तर शाबासकी दया आणि वाचता येत नसेल तर रागाऊ किंवा जोरात बोलून परत परत विचारू नका.

**अक्षरे**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ड | प | स | र | ह | म | ज | फ | श |

शब्द मराठी

| | | |
|---|---|---|
| आरसा | उंदीर | बैल |
| फुगा | बस | गरम |

शब्द कोरकू

| | | |
|---|---|---|
| आईना | पुची | डोबा |
| फुग्गा | सुबाय | च्याटा |

============================

शब्द नेमाडी

| | | |
|---|---|---|
| आरश्या | उंदरू | बेल |
| फुग्गू | मुटेर | तातल |

परिच्छेद मराठी

आज रविवार आहे.
शाळेला सुटी आहे.
तरी आज सकाळी
मला लवकर जाग आली.

परिच्छेद कोरकू

टइन इतवार.
इस्कुलेन सुट्टी.
पोणीबी टइन इन झटोका बिड्जेन.
इन झेटोका बिट जेन.

परिच्छेद नेमाडी

आज दितवार शे.
इस्कुल काजे सुटी शे.
तीही बी
मी संदारे मम्मार जागी गुई.

## परिच्छेद मराठी

मी कोण ?

शेत नांगरतो, डवरे वायतो,
पेरणी करतो, तण काढतो,
खत घालतो, पाणी देतो,
कष्ट करून धान्य देतो.

## परिच्छेद कोरकू

इन जे ?

खिटी नानगारडा, डवराबा,
बिबिडडा, झारा ओड्डा,
खटो आंडाबा, डा आरा बा,
मेहनत टे पिको जे बा.

## परिच्छेद नेमाडी

मी कुण ?

शेतमा हल जूप, कुलकू जूप,
ऐर, नेन्द,
खत नाख, पाणी दम,
मेहनत करीन दाना दम.

आपल्या मुलांना वरील मजकूर वाचता येतो का, हे तुम्ही पाहिलंत. जर तुमची मुलं नियमित शाळेत गेली असतील, तर निश्चितच मुलांना चांगलं वाचता आलं असेल, नाहीतर मूल शाळेत नियमित गेलं नसेल तर अडखळले असेल, नाही का ? त्यामुळे आपल्या मुलांना नियमित शाळेत पाठविणे गरजेचे आहे.

इथे आ नं द न ग री या अक्षरांची मांडणी अशा रीतीने करा की प्रत्येक उभ्या रांगेत, प्रत्येक आडव्या रांगेत व प्रत्येक चौकटीत आ नं द न ग री वस्ती करेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नं | | | | री |
| | | री | | नं | |
| | | नं | | री | |
| री | | | नं | | |
| | री | | | | नं |
| नं | | | री | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आ | नं | द | न | ग | री |
| न | ग | री | आ | नं | द |
| द | आ | नं | ग | री | न |
| री | न | ग | नं | द | आ |
| ग | री | न | द | आ | नं |
| नं | द | आ | री | न | ग |


# शाळा प्रगतीचा टक्का घसरला!

**केवळ ४० टक्केच शाळा प्रगत: ९१२ पैकी ३४४ शाळाच प्रगत**

**अकोला:** प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील प्राथमिक शाळा डिजिटल आणि ई-लर्निंग करण्यावर भर देऊन शाळा आणि विद्यार्थ्यांची प्रगती उंचावण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये प्राथमिक शाळांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावत असताना, अकोला जिल्ह्यात मात्र शाळांच्या प्रगतीची टक्केवारी घसरत आहे. गतवर्षी जिल्ह्यातील ६२ टक्के शाळा प्रगत झाल्या होत्या; परंतु यंदा मात्र केवळ ४० टक्केच शाळा प्रगत होऊ शकल्या.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमांतर्गत प्राथमिक शाळेत जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुसार अपेक्षित क्षमता प्राप्त करणे, चाचण्यांच्या माध्यमातून मूल्यमापन करणे, भाषा व गणित विषयातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, ज्ञानरचनावाद शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न केल्या जातात, तसेच शाळा डिजिटल करून प्रत्येक चार विद्यार्थ्यांमागे एक टॅब्लेट देऊन त्यांना स्मार्ट करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यांमधील ७० ते ८० टक्के शाळा प्रगत झाल्या आहेत. या जिल्ह्यांच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात कासवगतीने शाळांची प्रगती होत आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमास शहरातील शाळांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, ग्रामीण भागातील शाळांमध्ये विपरीत स्थिती आहे. जिल्ह्यात एकूण ९१२ प्राथमिक शाळा आहेत. त्यापैकी अर्ध्याही शाळा प्रगत झाल्या नसल्याची वस्तुस्थिती आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ३४४ शाळाच प्रगत झाल्या आहेत. शिक्षण विभागाने जिल्ह्यातील अधिकाधिक शाळा प्रगत करण्यासाठी प्रयत्न केले आहेत; परंतु शिक्षकांकडून फारसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या प्रगतीचा टक्का घसरला आहे. (प्रतिनिधी)

आतापर्यंत जिल्ह्यातील ३४४ शाळा प्रगत झाल्या आहेत. उर्वरित शाळासुद्धा प्रगत करण्यावर आमचा भर आहे. येत्या काही महिन्यात प्रगत शाळांची संख्या वाढेल.
– प्रशांत दिग्रसकर,
शिक्षणाधिकारी, प्राथमिक

**दैनिक लोकमत दि. ११ एप्रिल २०१७ अकोला ग्रामीण पुरवणी पान नं. ३ वरील बातमी.**

उन्नती संस्था, द्वारा अरुण सोनोने, पूर्वा नगर, MSEB कार्यालयासमोर, आडगाव बुद्रुक ता. तेल्हारा, जि. - अकोला